जनसंपर्क कक्ष
30 OCT 2022
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेटसह विविध गटांसाठी अखेरच्या दिवशी ५०१ अर्ज दाखल

## छाननी सोमवारी : पदवीधरसह सिनेटसाठी सर्वाधिक २९० अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारपर्यंत एकूण ५०१ उमेदवारांनी अर्ज भरल्याची माहिती शनिवारी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. पदवीधरच्या १६४ जागांसह सिनेटसाठी सर्वाधिक २९०, विद्या परिषदेसाठी २७ आणि ३६ अभ्यासमंडळांच्या प्रत्येकी ३ जागांसाठी १८४ अर्ज दाखल आहेत.

सोमवार, दि. १४ नोव्हेंबरला कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर निवडणूक होणार आहे. छाननी सोमवार, दि. ३१ ऑक्टोबरला तर अर्ज माघारीसाठी १ नोव्हेंबरची मुदत आहे.



सिनेटच्या ३९ प्रतिनिधींसाठी २९० अर्ज आहेत. यात संस्था प्रतिनिधींच्या खुल्या गटातील ४ जागांसाठी २२, महिला वर्गासाठी ३, प्राचार्य प्रतिनिधीच्या खुल्या गटातील ५ जागांसाठी ९, महिलांसाठी एक, अनुसूचित जातीसाठी ३, भटक्या व विमुक्त जमातीसाठी १, इतर मागासवर्गासाठी ३ असे १० जागांसाठी १७ अर्ज आहेत. महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधीच्या खुल्या गटात ५ जागांसाठी २७, महिला गटासाठी ३, अनुसूचित जातीसाठी १५, अनुसूचित जमातीसाठी ३, भटक्या व विमुक्तसाठी ८, इतर मागासवर्ग गटात ३ अशा १० जागांसाठी ५९ अर्ज आहेत. पदवीधरसाठी खुल्या गटातील ५ जागांसाठी ९१, महिला गटासाठी १८, अनुसूचित जातीसाठी १५, अनुसूचित जमातीसाठी ५, भटक्या व विमुक्त जमातीसाठी १९, इतर मागासवर्गासाठी १६ असे १० जागांसाठी १६४ अर्ज आले. विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधीच्या खुल्या गटात ११, महिला गटात ८, अनुसूचित जमातीसाठी ६ अशा ३ जागांसाठी २५ अर्ज आले आहेत.

विद्यापरिषद शिक्षक प्रतिनिधीच्या ८ जागांसाठी २७ अर्ज आले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञानच्या खुल्या जागेसाठी ५, अनुसूचित जमातीसाठी २, वाणिज्य व व्यवस्थापनच्या खुल्या महिला गटासाठी २ अर्ज दाखल झाले.

पुढारी

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेची मंगळवारपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस १ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंक वर प्रवेशाची माहिती आहे. http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालय व मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेशित आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचा ही लाभ मिळणार आहे. विद्यापीठ मुख्य कार्यालय, नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

30 OCT 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेच्या ३९ जागांसाठी २९० अर्ज

## शिवाजी विद्यापीठ; उद्या होणार छाननी; १ नोव्हेंबर माघारीची मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकी अंतर्गत अधिसभेच्या ३९ जागांसाठी सुमारे २९० अर्ज प्राप्त झाले आहेत.



संस्था प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या ४ जागांसाठी २२ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी ३ अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी अर्ज प्राप्त झालेले नाहीत. प्राचार्य प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या ५ जागांसाठी ९ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी १ अर्ज, अनुसूचित जाती प्रतिनिधी एका जागेसाठी तीन अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी शून्य अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी एक अर्ज, इतर मागासवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी तीन अर्ज असे दहा जागांसाठी १७ अर्ज प्राप्त झाले आहेत.

महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी २७ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी ३ अर्ज, अनुसूचित जाती प्रतिनिधी एका जागेसाठी १५ अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी ३ अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी ८ अर्ज, इतर मागासवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी तीन अर्ज असे दहा जागांसाठी ५९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी ९१ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी १८ अर्ज, अनुसूचित जाती प्रतिनिधी एका जागेसाठी १५ अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी ५ अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी १९ अर्ज, इतर मागासवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी १६ अर्ज, असे एकूण दहा जागांसाठी १६४ अर्ज प्राप्त झाले आहेत. विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या एका जागेसाठी ११ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी ८ अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी ६ अर्ज, असे एकूण तीन जागांसाठी २५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

विद्या परिषद शिक्षक प्रतिनिधी निवडणुकीसाठी ८ प्रतिनिधींसाठी २७ अर्ज प्राप्त झाले आहेत. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ५, तर अनुसूचित जमाती जागेसाठी २ अर्ज प्राप्त झाले आहेत. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या खुल्या महिला जागेसाठी २ तर भटक्या व विमुक्त जमाती जागेसाठी शून्य अर्ज प्राप्त झाले आहेत. मानव्यविद्या विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ४ तर अनुसूचित जाती जागेसाठी ४ अर्ज प्राप्त झाले आहेत. आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ९ तर इतर मागासवर्ग जागेसाठी १ अर्ज प्राप्त झाले आहेत. ३६ अभ्यासमंडळांवर प्रत्येकी ३ जागांसाठी १८४ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

### १४ नोव्हेंबरला मतदान, १६ रोजी मतमोजणी

निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची छाननी सोमवार (दि. ३१) रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या वेळेनुसार होणार आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेण्याची मुदत आहे. त्यानंतर निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठ कार्यालयात मतमोजणी होणार आहे.

पुण्यनगरी

## शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक

# 'नोंदणीकृत पदवीधर'च्या १० जागांसाठी १६४ अर्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकांसाठी सोमवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटच्या दिवशी दि. २८ ऑक्टोबरपर्यंत विविध गटांसाठी अर्ज दाखल करण्यात आले. नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधींच्या दहा जागांसाठी मोठ्या संख्येने १६४ अर्ज दाखल करण्यात आले.

अधिसभा निवडणुकीसाठी ३९ प्रतिनिधींसाठी २९० अर्ज, महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधीच्या १० जागांसाठी ५९ अर्ज, विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधीच्या ३ जागांसाठी २५ अर्ज, विद्या परिषद शिक्षक प्रतिनिधी निवडणुकीसाठी ८ प्रतिनिधींसाठी २७ अर्ज, तर ३६ अभ्यास मंडळांवर प्रत्येकी ३ जागांसाठी एकूण १८४ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जांची छाननी सोमवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अर्ज छाननी आणि माघारीनंतरच निवडणुकांचे चित्र स्पष्ट होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ
30 OCT 2022

# सिनेटच्या ३९ जागांसाठी २९० अर्ज

## छाननी उद्या ; विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यादी होणार प्रसिद्ध

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत ३९ जागांसाठी २९० अर्ज दाखल झाले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शुक्रवार (ता. २८) अंतिम मुदत होती. अर्जांची छाननी सोमवारी (ता. ३१) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

अधिसभेसाठी संस्था प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गातील चार जागांसाठी २२, तर महिला प्रतिनिधींच्या एका जागेसाठी तीन अर्ज दाखल केले आहेत. अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही. प्राचार्य प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी नऊ, महिला प्रतिनिधीच्या एका जागेसाठी एक, अनुसूचित जातीच्या एका जागेसाठी तीन अर्ज दाखल झाले असून, अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी अर्ज दाखल झालेला नाही. भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी एक, इतर मागासवर्गच्या एका जागेसाठी तीन अर्जांची नोंद झाली आहे. महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गातील पाच जागांसाठी २७, महिला प्रतिनिधीच्या एका जागेसाठी तीन, अनुसूचित जाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी १५, अनुसूचित जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी तीन, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी आठ, इतर मागासवर्ग प्रतिनिधीच्या एका जागेसाठी तीन, असे दहा जागांसाठी ५९ अर्ज आले आहेत.

विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या एका जागेसाठी ११, महिला प्रतिनिधीच्या एका जागेसाठी आठ, अनुसूचित जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी सहा, अशा तीन जागांसाठी पंचवीस अर्जांची नोंदणी झाली आहे. विद्यापरिषद शिक्षक प्रतिनिधींच्या निवडणुकीत आठ जागांसाठी २७ अर्ज आले आहेत. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी पाच, तर अनुसूचित जमातच्या जागेसाठी दोन अर्ज दाखल झाले आहेत. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या खुल्या महिला जागेसाठी दोन, तर भटक्या व विमुक्त जमाती जागेसाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही. मानव्यविद्या विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी चार, अनुसूचित जातीच्या जागेसाठी चार, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी नऊ, तर इतर मागासवर्ग जागेसाठी एक अर्ज दाखल झाला आहे. ३६ अभ्यास मंडळांवर प्रत्येकी तीन जागांसाठी एकूण १८४ अर्ज दाखल झाले आहेत.

### पदवीधर प्रतिनिधींच्या दहा जागांसाठी १६४ अर्ज

नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गातील पाच जागांसाठी ९१, महिला प्रतिनिधीच्या एका जागेसाठी १८, अनुसूचित जाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी १५, अनुसूचित जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी पाच, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधीच्या एका जागेसाठी १९, इतर मागासवर्ग प्रतिनिधीच्या एका जागेसाठी १६, असे दहा जागांसाठी १६४ अर्ज दाखल झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2022
तरुण भारत

# अधिसभेच्या ३९ जागांसाठी २९० उमेदवारांचे अर्ज

## उमेदवारी अर्ज माघार घेण्यासाठी १ नोव्हेंबरपर्यंत मुदत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी शनिवारी उमेदवारी अर्ज भरले असून ३१ ऑक्टोबरला उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. अधिसभेच्या ३९ जागांसाठी २९० उमेदवारांनी अर्ज आले आहेत. यंदा विद्यापीठ विकास आघाडी, सुटा, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी परिषद, शिव-शाहू विचार मंच, अपक्षाचे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे विद्यापीठाची अधिसभेची निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता आहे. १ नोव्हेंबर अर्ज माघारीची अंतिम तारीख आहे. त्यानंतरच निवडणूकीचे चित्र स्पष्ट होईल.

शिवाजी विद्यापीठ निवडणूकीचा दुसरा टप्पा म्हणजे अर्ज भरण्याची प्रक्रिया संपली आहे. २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द



होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरूवात होणार आहे. अधिसभा निवडणुकीसाठी संस्थाप्रतिनिधी खुल्या प्रवर्गाच्या जागांसाठी २२ अर्ज, महिला प्रतिनिधी ३ अर्ज अनुसुचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी एकही अर्ज नाही. प्राचार्य खुला प्रवर्ग ५ जागांसाठी ९ अर्ज महिला प्रतिनिधी एका जागेसाठी एक अर्ज, अनुसूचित जाती प्रतिनिधी एका जागेसाठी तीन अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी शून्य अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी एक अर्ज, इतर मागासवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी तीन अर्ज असे दहा जागांसाठी १७ अर्ज प्राप्त झाले आहेत.

महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी २७ अर्ज, महिला प्रतिनिधी एका जागेसाठी ३ अर्ज, अनुसूचित जाती एका जागेसाठी १५ अर्ज, अनुसूचित जमाती प्रतिनिधी एका जागेसाठी ३ अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती एका जागेसाठी ८ अर्ज, इतर मागासवर्ग एका जागेसाठी तीन अर्ज असे दहा जागांसाठी ५९ अर्ज आले आहेत. नोंदणीकृत पदवीधर खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी ९१ अर्ज, महिला एका जागेसाठी १८ अर्ज, अनुसूचित जाती एका जागेसाठी १५ अर्ज, अनुसूचित जमाती एका जागेसाठी ५ अर्ज, भटक्या व विमुक्त जमाती एका जागेसाठी १९ अर्ज, इतर मागासवर्ग एका जागेसाठी १६ अर्ज, दहा जागांसाठी १६४ अर्ज आले आहेत. विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधींच्या खुल्या प्रवर्गाच्या एका जागेसाठी ११ अर्ज, महिला एका जागेसाठी ८ अर्ज, अनुसूचित जमाती एका जागेसाठी ६ अर्ज, असे एकूण तीन जागांसाठी २५ अर्ज आले आहेत. विद्यापरिषद शिक्षक प्रतिनिधी निवडणुकीसाठी ८ प्रतिनिधींसाठी २७ अर्ज प्राप्त झाले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ५, तर अनुसूचित जमाती जागेसाठी २ अर्ज आले आहेत. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या खुल्या महिला जागेसाठी २ तर भटक्या व विमुक्त जमाती जागेसाठी शून्य अर्ज आले आहेत. मानव्यविद्या विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ४ तर अनुसूचित जाती जागेसाठी ४ अर्ज आले आहेत. आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या खुल्या जागेसाठी ९ तर इतर मागासवर्ग जागेसाठी १ अर्ज आले आहेत. ३६ अभ्यासमंडळांवर ३ जागांसाठी १८४ अर्ज आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.